लोकमत पुणे, गुरुवार, दि. ९ ऑगस्ट २०१८

# हिंदी भित्तीपत्रिकेचे कॉलेजमध्ये उद्घाटन

## संपर्क व राजभाषा : विद्यार्थ्यांचे भाषेवर हवे प्रभुत्व

लोकमत न्यूज नेटवर्क

**बिजवडी** : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात मंगळवारी (दि. ७) हिंदी भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले.

हिंदी ही एक स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा, संपर्क भाषा आणि राजभाषा म्हणून ओळखली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या लेखन शैली, सुप्तगुणांचा विकास व्हावा, हिंदी भाषेविषयी जनजागृती व आवड निर्माण व्हावी हा उद्देश समोर ठेवून महाविद्यालयामध्ये हिंदी भित्तिपत्रकाचे प्रदर्शन घेण्यात आले होते. विद्यार्थांना स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी भाषेवर तसेच आपल्या लेखन शैलीवर प्रभुत्व असणे किती महत्वाचे आहे हे विविध उदाहरणे देवून स्पष्ट केले होते.



इंदापूर महाविद्यालयातील हिंदी भित्तीपत्रक उद्घाटन कार्यक्रमात उपस्थित मान्यवर.

विश्वस्त अंकिता पाटील म्हणाल्या, आपल्या करीयरसाठी भाषेस अधिक महत्त्व आहे. विद्यार्थिनींनी सकारात्मक तसेच धाडसी वृत्तीने आपली कार्यक्षमता सिध्द करावी तसेच मुलींनी अबला नव्हे तर सबला म्हणून पुढे आले पाहिजे. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, उपप्राचार्य प्रा. नागनाथ ढवळे, क्रिडासंचालक प्रा. भरत भुजबळ, प्रा. बाळासाहेब काळे , प्रा. गौतम यादव प्रा. कल्पना भोसले, डॉ. महंमद मुलाणी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. शितल माने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. शुभांगी वाघ, प्रा. सोमनाथ चव्हाण, हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

प्राचार्य
कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे

सोलापूर
माणदेश नगरी
ध्यास समाज परिवर्तनाचा

# इंदापूर महाविद्यालयात हिंदी साहित्य विषयावर कार्यशाळा



इंदापूर, (प्रतिनिधी) :
इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात हिंदी विभागच्या वतीने 'हिंदी साहित्य विधाएँ' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन पुणे येथील एस. पी. महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. पद्मजा घोरपडे यांनी केले. यावेळी हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी शोध निबंधाचे वाचन पी.पी.टी.च्या साह्याने केले.

महाराष्ट्र राज्याचे माजी संसदीय व सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले, संस्थेचे सचिव मुकुंद शहा यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे आणि हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शीतल माने यांनी दिली.

डॉ. पद्मजा घोरपडे म्हणाल्या की, 'विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन यामध्ये गोडी निर्माण करावी, तरच आपल्या बुद्धिचा विकास होईल. शिक्षण केवळ नोकरी मिळविण्यासाठी करू नका तर जीवनात आनंद मिळविण्यासाठी करा. नोकरी तर आपल्या कर्तृत्वावर लागेल, यात काही शंका नाही. सरकारी कार्यलयात अनुवादक, पत्रकार, संवाद लेखन या पदाची आवश्यकता असते. परंतु, आपण त्या पदापर्यंत पोहचू शकत नाही. आपण कोठे कमी पडतो, याचा विचार केला पाहिजे. हिंदी केंद्रिय निर्देशलाय दिल्ली मार्फत नवलेखकासाठी शिबिराचे आयोजन केले जाते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा. प्रा. भगवान बारवकर यावेळी उपस्थित होते. प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शीतल माने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभांगी वाघ यांनी केले. आभार प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी मानले.

लोकमत पुणे, गुरुवार, दि. ९ ऑगस्ट २०१८

# हिंदी भित्तीपत्रिकेचे कॉलेजमध्ये उद्‌घाटन

## संपर्क व राजभाषा : विद्यार्थ्यांचे भाषेवर हवे प्रभुत्व

लोकमत न्यूज नेटवर्क

**बिजवडी :** इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात मंगळवारी (दि. ७) हिंदी भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन करण्यात आले.

हिंदी ही एक स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा, संपर्क भाषा आणि राजभाषा म्हणून ओळखली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या लेखन शैली, सुप्तगुणांचा विकास व्हावा, हिंदी भाषेविषयी जनजागृती व आवड निर्माण व्हावी हा उद्देश समोर ठेवून महाविद्यालयामध्ये हिंदी भित्तिपत्रकाचे प्रदर्शन घेण्यात आले होते. विद्यार्थांना स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी भाषेवर तसेच आपल्या लेखन शैलीवर प्रभुत्व असणे किती महत्वाचे आहे हे विविध उदाहरणे देवून स्पष्ट केले होते.



इंदापूर महाविद्यालयातील हिंदी भित्तीपत्रक उद्‌घाटन कार्यक्रमात उपस्थित मान्यवर.

विश्वस्त अंकिता पाटील म्हणाल्या, आपल्या करीयरसाठी भाषेस अधिक महत्त्व आहे. विद्यार्थिनींनी सकारात्मक तसेच धाडसी वृत्तीने आपली कार्यक्षमता सिध्द करावी तसेच मुलींनी अबला नव्हे तर सबला म्हणून पुढे आले पाहिजे. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, उपप्राचार्य प्रा. नागनाथ ढवळे, क्रिडासंचालक प्रा. भरत भुजबळ, प्रा. बाळासाहेब काळे, प्रा. गौतम यादव प्रा. कल्पना भोसले, डॉ. महंमद मुलाणी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. शितल माने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. शुभांगी वाघ, प्रा. सोमनाथ चव्हाण, हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

प्राचार्य
कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे